संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com

• वर्ष : ७ वे • • अंक : ५१ वा • • रविवार दि. २० ऑगस्ट २०२३ • • किंमत २ रु • पाने : ४ • RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
डॉ.सौ. चैताली सत्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सत्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)
उपलब्ध सुविधा
✲ सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे ✲ गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे ✲ पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन ✲ वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी ✲ इंटरव्हेशनल सोनोग्राफी ✲ सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

# कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के शुल्क

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** टोमॅटो नंतर कांद्याचे भाव देखील वाढणार आहे. केंद्र सरकारने या संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावले आहे. शनिवारी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत केंद्र सरकारने याबाबतची माहिती दिली आहे. त्यामुळे कांद्याचे भाव वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावले आहे. शनिवारी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत सरकारने म्हटले आहे की, सरकार ३१ डिसेंबरपर्यंत कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावणार आहे. म्हणजेच आता परदेशात कांदा विकल्यास विक्रेत्याला ४० टक्के शुल्क सरकारला भरावे लागणार आहे. त्यामुळे कांद्याचे भाव वाढण्याची शक्यता आहे.

गेल्या आठवड्यात, ऑक्टोबरमध्ये नवीन पीक येईपर्यंत किमती नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने सरकारने विशिष्ट प्रदेशांमध्ये आपल्या बफर स्टॉकमधून कांदे त्वरित सोडण्याची घोषणा केली.तसेच सरकार कांद्याच्या वितरणासाठी ई-लिलाव, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि राज्य प्राधिकरणांसोबतच्या भागीदारीसह ग्राहक सहकारी संस्था आणि कॉर्पोरेशनद्वारे चालवल्या जाणाऱ्या त्यांच्या किरकोळ विक्री केंद्रांद्वारे सवलत देण्यासाठी विविध माध्यमांचा शोध घेत आहे. सरकारी आकडेवारीनुसार कांद्याच्या दरात थोडीशी वाढ दिसू लागली आहे. १० ऑगस्टपर्यंत, कांद्याची किरकोळ किंमत २७.९० रुपये प्रति किलो होती, जी मागील वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत २ रुपये प्रति किलोने वाढ झाली आहे. दरम्यान आता टोमॅटोनंतर आता कांद्याच्या दरवाढीने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे.

# भाजप कधी संपून जाईल, कळणार नाही : महादेव जानकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** वापरा आणि फेकून द्या या सध्या च्या धोरणामुळे भाजप कधी संपून जाईल सांगता येणार नाही. आम्ही, आता कुणाच्या मागे लागणार नाही, ज्यांना गरज असेल, ते स्वतः हून मागे येतील. पक्ष वाढवायचा असेल तर मतांची टक्केवारीपण बघितली पाहिजे. त्यासाठी रासप आपला प्रत्येक निवडणूकीत उमेदवार उभा करणार असून लोकसभेला माझे प्रथम प्राधान्य राहील असे मते राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी आटपाडी निंबवडे येथे पत्रकारांशी बोलताना केले. पुढे बोलताना ते म्हणाले, राज्यात नको त्याला फार महत्त्व दिले जात आहे. महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्ये करणाऱ्याला सरकार पाठीशी घालत असून याला विरोधक ही जबाबदार असल्याचे सांगत त्यांनी नाव न घेता संभाजी भिडे यांच्यावर टीका केली. तसेच माणदेशात असणारे मुस्लीम ही येथील असल्याने



निंबवडे : येथे रस्त्यावरच जनस्वराज्य यात्रेचा ताफा थांबवून पत्रकाराशी मनमोकळ्या गप्पा मारताना महादेव जानकर

लव्ह-जिहाद सारखे प्रश्न जाणीवपूर्वक तयार केले जात असून त्याला खतपाणी घातले जात असल्याची खंत ही बोलून दाखविली.

सध्या केंद्र सरकारने नोकऱ्यातील आरक्षण काढून टाकले असून, मुलांना येथून पुढे शासकीय नोकरी मिळणे कठीण असल्याचे सांगत, मुलांना उद्योजक बनविण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच येथून पुढील काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती मध्ये मतदान करताना स्थानिक पातळीचा विचार जरूर करावा परंतु लोकसभेला मात्र मतदान करताना विचारपूर्वक करण्याचे आवाहन ही त्यांनी नागरिकांना केले.

जूस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने आटपाडी तालुक्यात राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर आले होते. यावेळी दिघंची येथून जनस्वराज्य यात्रेला सुरुवात होवून आटपाडी तालुक्यातील आटपाडी, निंबवडे, कामथ, घाणंद, खरसुंडी, मिटकी, बनपुरी, करगणी, गोमेवाडी, मानेवाडीअशी जनस्वराज्य यात्रा संपन्न झाली. यावेळी रासपचे लक्ष्मण सरगर, उमाजी सरगर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते या यात्रेमध्ये सहभागी झाले होते.

# शिवसेना तालुका प्रमुखांसह सहाजणांवर गुन्हा दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील सहाय्यक व अन्य दोन कर्मचार्यांना मारहाण, शिवीगाळ करून शासकीय कामात अडथळा आणला व खंडणी मागितल्याप्रकरणी शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख प्रदीप बाळकृष्ण माने यांच्यासह अन्य पाच जणांवर तासगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला.

याप्रकरणी भूमी अधीक्षक कार्यालयातील सहाय्यक चंद्रकांत घुळाप्पा शिरढोणे (वय ५५, रा. वासुंबे फाटा, तासगाव) यांनी फिर्याद दाखल केली. गुन्हा दाखल झालेल्यात प्रदीप माने (रा. सावर्डे), विशाल अशोकराव भोसले (रा. भोसले मळा , खाडेबाडी, तासगाव), सुनील शशिकांत घेवारे (रा. हातनूर) व अन्य अनोळखी तीन जणांचा यात समावेश आहे.


याबाबत पोलिसातून मिळालेली अधिक माहिती अशी : फिर्यादी शिरढोणे हे त्यांच्या कार्यालयात काम करीत असताना संशयित हे कार्यालयात आले. त्यांनी जुन्या कामाच्या कारणावरून शिवीगाळ करून प्रदीप माने यांनी शिरढोणे व त्यांच्यासोबत असणारे दत्ता अर्जुन जगताप, बाळासो पांडुरंग लोखंडे यांना कानाखाली मारली. संशयित विशाल भोसले यांनी व इतर संशयित यांनी शिवीगाळ केली. संशयित भोसले यांनी कार्यालयातील खुर्ची आपटून मोडतोड केली.

महिला कर्मचारी प्रियंका देसाई यांना शिवीगाळ केली. त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. टेबलवर ठेवलेला सरकारी नकाशा जबरदस्तीने ताब्यात घेऊन त्याचे व्हिडीओ शूटिंग केले. हे सगळे प्रकार बंद करायचे असतील तर सगळ्या कार्यालयाप्रमाणे फंड म्हणून पैसे द्यावे लागतील, असे म्हणून शासकीय कामात अडथळा आणला. शासकीय साहित्याची मोडतोड करून खंडणी स्वरूपात पैशाची मागणी केली. या सर्व घटनेचा व्हिडीओ करून प्रसार माध्यमातून व्हायरल केला. त्यामुळे फिर्यादी व शासकीय कार्यालयाची बदनामी केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# एपीआय चंदनशिवे खून प्रकरणी दोघांना अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** सांगली जिल्हा पोलीस दलात एपीआय असणाऱ्या सुरज चंदनशिवे यांच्या खून प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सुनील मधुकर केदार व विजय बबन केदार (दोघे रा .वसुद ता. सांगोला) अशी तक केलेल्या आरोपींची नावे



सुरज चंदनशिवे

असून त्यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना दिनांक २४ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

यातील सुनील केदार हा मुंबई पोलीस दलात पोलीस असल्याचे समजते.

# आटपाडीतील राजारामबापू हायस्कुलला १० लाख रुपये निधी : आम. महादेव जानकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** राजारामबापू हायस्कुलसाठी आमदार फडातून १० लाख रुपये देत असल्याची घोषणा राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी मंत्री आमदार महादेव जानकर यांनी केली.

राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी मंत्री, आमदार महादेवराव जानकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर जन स्वराज यात्रा सुरू आहे . आटपाडी तालुक्यातील दिघंची पासून सुरू झालेल्या जनस्वराज यात्रेचे ठिकठिकाणी शेकडोंनी उस्फूर्त स्वागत केले . आटपाडी येथील राजारामबापू हायस्कुल येथे आम. महादेव जानकर यांचे आगमन झाल्यावर श्री भवानी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रावसाहेबकाका पाटील यांच्या हस्ते आणि राष्ट्रवादी



आटपाडी : येथील राजारामबापू हायस्कूल येथे माजी मंत्री आम. महादेव जानकर यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर

काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशचे महासचिव सादिक खाटीक, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सुरज पाटील, विकास देशमुख, मुख्याध्यापक टी. डी. चव्हाण यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना महादेव जानकर म्हणाले, संविधान लोकशाही हा आपला आत्मा आहे . भविष्यात संविधान समर्थकांच्या समवेतच आपली वाटचाल राहणार आहे . माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या पिताश्रींच्या नावच्या या राजारामबापू हायस्कुल या प्रशाले विषयी मला लहानपणा पासून मोठे आकर्षण राहीले आहे . प्रशालेतल्या कार्यक्रमासाठी पुर्ण दिवसाचा वेळ काढून मी येणार आहे . तुमच्या समवेत जेवणार आहे . लवकरच या कार्यक्रमाचे नियोजन करा . राजारामबापू हायस्कुलमधील ग्रंथालयासाठी माझ्या आमदार फंडातून दहा लाख रुपयांचा निधी मी देत आहे, अशी घोषणा माजी मंत्री, आमदार महादेवराव जानकर यांनी केली .

यावेळी रासपचे जिल्ह्याचे नेते लक्ष्मण सरगर, उमाजी चव्हाण, अजित पाटील, तात्यासाहेब गायकवाड, नितीन डांगे, दीपक पाटील, प्रशालेतील शिक्षक दादासाहेब मोटे, साहेबराव पाटील, संतोष पाटील, महादेव देवकर इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आटपाडीत नागपंचमी महोत्सव चे आयोजन

## जवळे ज्वेलर्स ॲण्ड सन्स च्या वतीने सहभागी महिलांना मिळणार हमखास बक्षीस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/धिरज प्रक्षाळे :** आटपाडी तालुक्यातील महिलांसाठी प्रथमच आटपाडी शहरामध्ये जवळे ज्वेलर्स ॲण्ड सन्स च्या वतीने नागपंचमी महोत्सव आयोजित करण्यात आला असून यामध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धकांना जवळे ज्वेलर्स ॲण्ड सन्स च्या वतीने हमखास भेटवस्तू व गिफ्ट मिळणार आहे.

आटपाडी शहरामध्ये जवळे ज्वेलर्स ॲण्ड सन्स च्या वतीने नागपंचमी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये महिलांना मोफत प्रवेश देण्यात येणार आहे. खेळात सहभाग घेणाऱ्यास पाच पैठणी, पाच चांदीचे छल्ले, पाच ठुशी व १ ग्रॅमची नथ देण्यात येणार आहे. सदरचा कार्यक्रम हा जवळे मल्टीपर्पज हॉल, आटपाडी येथे रविवार दिनांक २० रोजी दुपारी ४.०० वा. आयोजित करण्यात आला असून




प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी स्वाती बालटे निवेदिका असणार असून या कार्यक्रमास महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जवळे ज्वेलर्स ॲण्ड सन्स च्या वतीने करण्यात आले आहे.

भाऊ
कन्स्ट्रक्शन
बिल्डर्स & डेव्हलपर्स
9004792356
- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

# कामथ गावातील लग्न ठरलं चर्चेचा विषय

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/रेश्मा राजगे :** आटपाडी तालुक्यातील कामथ गावामधे दिनांक १७ ऑगस्ट रोजी एक कौतुकास्पद विवाह सोहळा पार पडला. याचं कारण म्हणजे गावातील लोकांचे एकत्रीकरणव वैचारिक विचार. कामथ गावातील युवक दिलीप सुतार हा अनाथ आहे. त्यामुळे तो आणि त्याचा छोटा भाऊ असे असे दोघांचे कुटुंब आहे. दिलीप हा लाईट फीटिंग चे काम करतो. त्याचा स्वभाव ही शांत प्रेमळ आहेच. परंतु तो नेहमीच दुसऱ्याची मदत करण्यास हजर असायचे. त्यामुळे गावातील लोकांना त्यांचा नेहमीच अभिमान वाटायचा. पण त्यांना आईवडील नसल्याने त्यांच्या लग्नाची चिंता मात्र होती. पण या कामथ गावातील सर्व प्रमुखांनी एकत्र येऊन त्यांचा विवाह लावून द्यायचा निर्णय घेतला. मुलगा अनाथ असल्याने मुलगी



कामथ : येथील महेश सुतार याच्या लग्नाप्रसंगी उपस्थित गावातील प्रमुख मान्यवर

कोण देणार याची खंत होतीच. परंतु कामथ गावातील प्रमुखांनी विचारपूर्वक निर्णय घेऊन विटा येथील अनाथ आश्रमातील मुलगी प्राची हिच्या सोबत त्याचे लग्न जमविले. मुलगी प्राची ही सुद्धा अनाथ असल्याने ती विटा येथील अनाथ आश्रमामध्ये राहत होती. दोघांची ही पसंती आल्याने गावातील नागरिकांनी मोठ्या मनाने व माणुसकी या नात्याने देणगी काढून श्रीमंतांना ही लाजवेल असा दिलीप व प्राची यांचा विवाह सोहळा मोठ्या धुधडाक्यात लावून दिला. त्यामुळे या लग्नाची चर्चा ही सगळीकडे होत आहे व कामथ गावातील नागरिकांचे ही कौतुक होत आहे.

# म्हसवडमध्ये मोटारसायकल अपघातात एक ठार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** म्हसवड येथील सातारा-पंढरपूर रस्त्यावरील माणगंगा नदीवरील पुलाचे लगत असलेले फूटपाथवर विशाल वस्ताद दोलताडे (वय २६) रा. भाटकी, ता. माण, जि. सातारा याचा मोटरसायकल अपघातात होवून त्याचा जागेवरच मयत झाला.

विशाल दोलताडे हा दि. १८ रोजी रात्रीच्या सुमारास मोटार सायकल वरून माणगंगा नदीवरील पुलावर आला असता, पुलाच्या फुटपाथाला त्याच्या मोटारसायकलची धडक बसल्याने या अपघातामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची नोंद म्हसवड पोलीस ठाणे येथे झाली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# कौठूळी येथील अण्णासो कदम यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** कौठूळी गावाचे सुपुत्र अण्णासो कदम यांचे निधन सह्याद्री हॉस्पिटल पुणे येथे उपचारा दरम्यान आज दि १९ रोजी सायंकाळी ५.०० च्या सुमारास निधन झाले.



अण्णासो कदम

अण्णासो कदम हे कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणगले येथे आरोग्य सेवक म्हणून सेवा बजावत होते. आजारी असल्याने त्यांच्यावर पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल येथे उपचार सुरु होते. परंतु आज दिनांक १९ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर उद्या दिनांक २० रोजी सकाळी ९.०० वाजता कौठूळी येथे अंत्यसंस्कार होणार असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांनी दिली.

# संपादकिय

## दाभोळकरांचे मारेकरी कधी पकडणार?

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे प्रमुख डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा काल स्मृतिदिन झाला. काल त्यांच्या १० व्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला अ कार्यकर्त्यांनी 'आवाज दो - हम एक है, लढेंगे जितेंगे', 'दहा वर्षे खुनाची-कार्यरत विवेकी असंतोषाची', 'फुले शाहू आंबेडकर - आम्ही सारे दाभोलकर', 'हिंसा के खिलाफ - मानवता की और' या घोषणा दिल्या आणि मशाल प्रज्वलित केली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने दाभोलकर यांचा खून झाला त्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुल येथे स्मृतिजागर अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यामुळे १० वर्ष झाली दाभोळकरांच्या खुनाचे मारेकरी सरकार पकडणार तर कधी असे अनेक प्रश्न सध्या उपस्थित होत आहेत. दाभोलकरांचे मारेकरी अजूनही मोकाट फिरत असल्याने सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे म्हणाले, दाभोलकरांचा खून होऊन साडेतीन हजार दिवस झाले. आमचा माणूस तर गेलाच, पण त्यांच्या मारेकऱ्यांवर कारवाई करून समाजात कायदा सुव्यवस्था नांदते हे सांगण्यात केंद्र-राज्य सरकार आणि तपास यंत्रणा अपयशी ठरल्या आहेत. कारवाईच्या मागणीसाठी दाभोलकरांच्या वैचारिक वारसदारांनी मोठा पाठपुरावा केला आहे. त्यामुळे सरकारने कार्यकर्त्यांचा अंत पाहू नये.

राज्य-केंद्र सरकारला दाभोलकरांच्या खुनाचा आणि तपास, कारवाईचे गांभीर्यच नाही. खुनाचे सूत्रधार माहीत असूनही कारवाई होत नाही. त्यांचा शोध घेवून त्यांना तत्काळ अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाही करावी. या अक्षम्य विलंबाबाबत राज्य व केंद्र सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी माधव बावगे यांनी केली.

खरे तर, नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर महाराष्ट्र सरकारने २०१३ साली तडकाफडकी जादूटोणा, अघोरी कृती, नरबळी आणि काळी जादू याच्या विरोधात कायदा संमत केला. या आधी हा कायदा पास व्हावा म्हणून दाभोलकरांनी २०१० पासून अनेक प्रयत्न केले होते.याच कायद्याचा मसुदा त्यांच्याच अंधश्रद्धा निर्मुलन समिती या संस्थेने तयार केला होता. मात्र, कायदा प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संमत होण्याआधीच म्हणजे २० ऑगस्ट २०१३ रोजी दाभोलकरांची पुण्यात हत्या करण्यात आली.

उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी हा कायदा 'हिंदू-विरोधी' आहे असं म्हणत याला विरोध केला होता. संसदेच्या सलग सात अधिवेशनांमध्ये यासंबंधी विधेयक मांडलं गेलं होतं, पण दाभोलकरांच्या मृत्यूआधी हा कायदा पास होऊ शकला नाही. या कायद्यात १२ कलमं आहेत. यात मारहाण, छळ, जबरदस्तीने मानवी विष्ठा खायला लावणं, भूत उतरवण्याच्या नावाखाली लैंगिक शोषण करणं, चमत्कार घडवण्याचा दावा करणं, काळी जादू केल्याचा आरोप करणं, काळी जादू केली म्हणून एखाद्याला बहिष्कृत करणं, जादूने एखाद्याचा आजार बरा करण्याचा दावा करणं अशा गुन्ह्यांसाठी शिक्षेची तरतूद आहे. आज महाराष्ट्रात या कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीबाबत काही प्रश्न असले, तरी या कायद्यान्वये अनेक जणांची अंधश्रद्धेच्या जाचातून सुटका झाली आहे.

डॉ. दाभोलकरांच्या हत्येला १० वर्षं होऊन गेली. मात्र, अजूनही तपास, न्यायालयीन प्रक्रिया यातच हे प्रकरण अडकलं आहे. सुरुवातीच्या काही वर्षांत तर फक्त तपास वेगवेगळ्या दिशेनं भरकटतानाच दिसून आला असून डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या केली असली तरी, विचारांची हत्या मात्र करता येणार नाही.




# गोवंशीय पशुधनाचे लसीकरण ऑगस्ट अखेर पूर्ण करा : राधाकृष्ण विखे-पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील पशुधनाचे मोफत लसीकरण करण्यात येत आहे. येत्या महिन्याच्या अखेरपर्यंत संपूर्ण राज्यातील गोवंशीय पशुधनाचे लसीकरण पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या.

राज्यामध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव पुन्हा दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर आज मंत्री श्री. विखे -पाटील यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यातील उपायुक्त (पशुसंवर्धन), सहआयुक्त (पशुसंवर्धन) व कृती दलाचे सदस्य यांचे समवेत आढावा बैठक घेतली. या बैठकीमध्ये राज्यातील लम्पी चर्मरोगाच्या प्रादुर्भावाबाबत आढावा घेण्यात आला.

श्री. विखे- पाटील म्हणाले की, मागील वर्षी दीड कोटी पशुधनाचे मोफत लसीकरण शासनामार्फत करण्यात आले. यावर्षी देखील १जुलै २०२३ पासून दुसऱ्या टप्प्यातील मोफत लसीकरणाची मोहीम शासनाने हाती घेतली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार गाभण जनावरे व वासरे यांचेही लसीकरण करण्यात येत आहे. आतापर्यंत १,३९,९२,३०४ पशुधनापैकी ८३,०५,८८९ (५९.४ टक्के) पशुधनाचे लसीकरण करण्यात आले आहे.

राज्यामध्ये प्रामुख्याने मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरमार्फत विद्यापीठाअंतर्गत असलेल्या तज्ञ अधिकाऱ्यांच्या पथकांना राज्यातील बाधितक्षेत्रात भेट देऊन, पशुसंवर्धन विभागाचे क्षेत्रीय अधिकारी व पशुपालकांना बाधित पशुधनाच्या उपचारासंदर्भात मार्गदर्शन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच उपचारासंदर्भात मागदर्शक सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश संबंधितांना दिले आहेत.



राधाकृष्ण विखे-पाटील

लम्पी चर्मरोगाने बाधित पशुधनाची लगतच्या राज्यातून वाहतूक टाळण्यासाठी तपासणी नाक्यांवर आवश्यक ती दक्षता घेण्याबाबत सुचित करण्यात यावे अशा सूचनाही श्री. विखे-पाटील यांनी दिल्या.

लम्पी चर्मरोग बाधित पशुधनावरील उपचार, लसीकरण व इतर पशुवैद्यकीय सेवेसाठी सेवाशुल्क माफ करण्यात येवून पशुपालकांच्या दारापर्यंत सेवा उपलब्ध करण्यात येत आहे. तसेच राज्यातील पशुधन पर्यवेक्षक व पशुधन विकास अधिकारी या रिक्त पदावर मनुष्यबळाच्या सेवा बाह्य स्त्रोताद्वारे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. लम्पी चर्मरोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी लसीकरण, बाधित जनावरांवर तात्काळ उपचार, बाधित जनावरांचे विलगीकरण करणे, ग्रामविकास विभागाच्या मदतीने पशुधनावरील व गोठ्यातील गोचिड व बाह्यकिटकांचे निर्मुलन व पशुपालकांचे प्रबोधन करण्याचे निर्देश दिले आहेत. प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंधक व नियंत्रण अधिनियम, २००९ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना बाधित जिल्ह्यांमधील स्थानिक स्थिती विचारात घेवून, जनावरांची वाहतूक करण्यासाठी आवश्यक असलेली २८ दिवसापूर्वीचे लसीकरणाबाबतचे प्रमाणपत्र बंधनकारक करणे, तसेच जनावरांचे बाजार यावर तात्पुरते निर्बंध घालण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# दिपाली सय्यद यांनी फुकटची भाकरी खावी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** शिवसेनानेत्या दीपाली सय्यद यांनी महाराष्ट्र निवनिर्माण सेनेवर टीका केली आहे. मनसेच्या कार्यकर्त्यांनी टोलनाके आणि गाड्या फोडण्यापेक्षा खड्डे बुजवण्याची मोहिम हाती घ्यावी, असा टोला दीपाली सय्यद यांनी लगावला. याला मनसे नेते संतोष धुरी यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. सय्यद यांनी या पक्षातून त्या पक्षात फिरत फुकटची भाकरी खावी, असं टीकास्त्र संतोष धुरी यांनी सोडलं आहे.

ट्वीट करत दीपाली सय्यद यांनी म्हटलं, मनसेच्या कार्यकर्त्यांनी टोलनाके आणि गाड्या फोडण्यापेक्षा खड्डे बुजवण्याची मोहिम घ्यावी. राज्यभरात जेवढे मनचेचे कार्यकर्ते तेवढेच रस्त्यावर खड्डे! दोन दिवसाचे काम, उगाच जेलमध्ये महिनाभर खाऊन देशाचे नुकसान आणि बाहेर स्टंटबाजी करून पन! युवा नेत्यांना घराबाहेर काढून कामाला लावा!

यावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना संतोष धुरी म्हणाले, सत्तेची भाकरी खाण्यासाठी या पक्षातून त्या पक्षात फिरत आहात. फुकटची भाकरी मिळतेय, ती खावी.आम्हाला त्याचं काही देणं-घेणं नाही. कुणावरही अन्याय होत असेल, तर त्यावर मनसेची लाथ पडणार. दीपाली सय्यद यांनी आपलं काम करावे. आम्ही आमचं काम करतोय. मुंबईतील रस्त्यांची दुर्दशा झाली होती, तेव्हा संबंधित लोकांना रस्त्यातील खड्ड्यात आम्ही उभं केलं होतं. त्यासाठी आम्ही ८ दिवस जेलमध्ये सुद्धा गेलो होतो. नंतर तातडीने मुंबईतील रस्ते दुरुस्त झाले होते.ही मनसेची दहशत होती, असं संतोष धुरी म्हणाले.




# स्वेरीची शैक्षणिक वाटचाल अभिमानास्पद

## आम. राम सातपुते : स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ थाटात संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पंढरपूर :** 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण मिळावे या उदात्त हेतूने अत्यंत हालअपेष्टा सहन करत आणि स्वतःला चंदनाप्रमाणे झिजवून अनेक अडचणींतून मार्ग काढत डॉ.बी.पी. रोंगे सरांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षणाचे द्वार खुले केले. विद्यार्थ्यांच्या उज्वल करिअरच्या दृष्टीने संस्थेच्या स्थापनेपासूनच अनेक नवनवीन उपक्रम राबवले जात आहेत.त्यामुळे स्वेरीला विविध पातळ्यांवर अभूतपूर्व यश मिळत आहे.महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सर्वोत्तम पद्धतीने तंत्रशिक्षणाचा प्रसार करत असलेले स्वेरी हे बहुधा एकमेव शिक्षणसंकुल असावे. मी देखील विद्यार्थी चळवळीतून पुढे आलो. विद्यार्थ्यांची पॉवर दाखवत आणि 'वंदे मातरम' चा नारा देत शिक्षण घेतले. आज अभियंता असूनही राजकारणात एक सकारात्मक विचार घेऊन व समाजासाठी काहीतरी करावे या हेतूने डॉ.रोंगे सरांची आणि त्यांच्या टीमची प्रेरणा घेत त्यांचे अनुकरण करत आहे.स्वेरीचे विद्यार्थी आज प्रचंड प्रमाणात यशस्वी होत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवून त्यांचे करिअर बनवण्याचे अत्यंत अवघड कार्य डॉ.रोंगे सरांनी हाती घेतले आहे, हे खरोखर कौतुकास्पद आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाला अधिक वेळ न देता स्वतःला घडविण्यासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा. आपल्या आई-वडिलांचे ऋण फेडण्यासोबतच आपल्याला देश घडवायचा आहे हे आपण लक्षात ठेवावे.' असे प्रतिपादन माळशिरस विधानसभेचे आमदार राम सातपुते यांनी केले.

स्वेरी संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरस विधानसभेचे आमदार राम सातपुते हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे प्रभारी कुलगुरू डॉ.रजनीश कामत हे होते.दीप प्रज्वलनानंतर स्वेरी गीताच्या ध्वनीमुद्रिकेचे अनावरण करण्यात आले.स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी प्रास्ताविकातून सर्वांचे स्वागत करून स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वाटचालीवर प्रकाश टाकला.




स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाचे उदघाटन करताना प्रमुख पाहुणे आमदार राम सातपुते, प्र.कुलगुरू रजनीश कामत, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे, प्रा.सूरज रोंगे व मान्यवर दुसऱ्या छायाचित्रात मार्गदर्शन करताना आमदार राम सातपुते तर तिसऱ्या छायाचित्रात 'स्वरानुभूती' या सांस्कृतिक कार्यक्रमात गीत गाताना कार्तिकी गायकवाड व सहकलाकार

१९९८ साली पत्र्याच्या शेड पासून सुरु झालेला हा प्रवास मोठमोठ्या इमारतींपर्यंत कसा पोहचला? या दरम्यान आलेल्या अडचणी आणि त्यावर केलेली मात यावर त्यांनी प्रकाश टाकला. पुढे डॉ.बी.पी.रोंगे म्हणाले की, 'स्वेरीच्या या पंचेवीस वर्षांच्या काळात अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी मी त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो. या स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वाटचालीत माझे गुरु विठ्ठल भगवान कुलकर्णी तथा आप्पा सर यांच्यापासून, पंढरपूर तालुक्याचे आमदार कै.सुधाकरपंत परिचारक, तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री दत्तात्रय राणे, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, माजी कुलगुरूधनागरे, आमदार दिलीप वळसे-पाटील, कै.पी. बी.पाटील, हभप तनपुरे महाराज, भारताचे शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.अनिल काकोडकर, बाटूचे माजी कुलगुरू डॉ.अशोक घाटोळ, सोलापूरच्या वालचंदचे प्राचार्य कै.डॉ.मदनाईक यांच्यासह, अर्बन बँकेचे अधिकारी भिंगे, गोपाळपूरचे सर्व सरपंच व ग्रामस्थ, स्वेरीचे सर्व देणगीदार, कुटुंबीय, नातेवाईक, मित्र परिवार तसेच अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी स्वेरीला घडवण्यात मोलाचे योगदान दिले.

अध्यक्षीय भाषणात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे प्रभारी कुलगुरू डॉ.रजनीश कामत म्हणाले की, 'स्वेरीच्या संशोधनातील प्रगतीमुळे सर्वात प्रथम माझ्या कानावर स्वेरीचे नाव आले असून त्यावेळी स्वेरीमध्ये संशोधन क्षेत्रात 'नॅशनल नॉलेज नेटवर्क' चे मोठे प्रोजेक्ट यशस्वी झाले होते. स्वेरी हे महत्त्वाच्या संशोधनाच्या संबंधी प्रबंध व प्रोजेक्ट सादर करणारे सोलापूर विद्यापीठामधील महाविद्यालय असल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. या ठिकाणी ग्रामीण आणि शहरी असा भेदभाव न राहता स्वेरीने तंत्रशिक्षणाचा विकास आणि त्याचा दर्जा सिद्ध केलेला आहे. पंचवीस वर्षाचा इतिहास उलगडताना स्वेरी सातत्याने करत असलेल्या परिश्रमाचे सार्थक झाले आहे. सर्वांचा विकास करत असताना 'व्हॅल्यू एज्युकेशन' हे देखील महत्त्वाचे आहे.स्वेरीच्या अनेक उपक्रमांमुळे महाराष्ट्रामध्ये स्वेरी इंजिनिअरिंग महाविद्यालयाकडे 'आदर्श महाविद्यालय' म्हणून पाहिले जाते. या महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रित गोष्टी असतात म्हणून स्वेरीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या माध्यमातून स्वेरीतून घडविले जाते. हे अवघड कार्य असून अनेकांना जमले नाही ते स्वेरीने ग्रामीण भागात यशस्वीपणे करून दाखवले याचाही सार्थ अभिमान वाटतो.' असे सांगून त्यांनी स्वेरीच्या कामगिरीचे भरभरून कौतुक केले.

यावेळी स्वेरीवर गीत लिहिल्याबद्दल गीतकार प्रा.संतोष मडकी, संगीतकार राजु पुरंदरे, गायक योगेश गायकवाड आणि गायिका अनारकली काराळे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी स्वेरीच्या प्रा.नीता कुलकर्णी यांनी स्वेरीवर स्वरचित कविताही सादर केली.या प्रसंगी स्वेरीचे उपाध्यक्ष हनिफ शेख, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त नामदेवराव कागदे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त प्रा. सी.बी.नाडगौडा, विश्वस्त अशोक भोसले, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी.रोंगे, विश्वस्त एस.टी.राऊत, युवा विश्वस्त प्रा.सूरज रोंगे, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ.प्रेमलता रोंगे, डॉ.श्रीदेवी, स्त्रीरोग तज्ञ डॉ.स्नेहा रोंगे, प्रसिद्ध भारुडकार चंदाताई तिवाडी, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, स्ट्रक्चरलचे प्रमोद जोशी, बाटुचे माजी कुलगुरू डॉ.अशोक घाटोळ, स्वेरीच्या गव्हर्निंग बॉडीचे डॉ.विजय कुलकर्णी, शास्त्रज्ञ व्ही.के.सूरी, वालचंद सांगलीच्या प्लेसमेंट विभागाचे संजय धायगुडे, माजी विद्यार्थी संघटनेचे दत्ता घोडके, डॉ.विश्वासराव मोरे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, स्वेरी परिवारातील सदस्य, विद्यार्थी, पालक, पंढरपूर पंचक्रोशीतील नागरिक, पत्रकार, वकील मित्र, हितचिंतक, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने सायंकाळी 'स्वरानुभूती' या सांस्कृतिक कार्यक्रमातून पार्श्वगायिका कार्तिकी गायकवाड, कौस्तुभ गायकवाड व कल्याणजी गायकवाड यांच्या भक्ती गीत, भावगीत, मिमिक्रीच्या माध्यमातून सर्वांना मंत्रमुग्ध केले.एकंदरीतच स्वेरीचा रौप्य महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ अतिशय उत्साहात पार पडला.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)






# शिक्षक–शिक्षकेत्तर सभासदांना १५ टक्के लाभांश देणार : बाबाराजे देशमूख

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** येथील नातेपुते एज्यूकेशन सोसायटी संचलित शिक्षक व शिक्षकेत्तर पतसंस्था सभासदाना १५ टक्के लाभांश देणार असल्याचे संस्थेचे मार्गदर्शक बाबाराजे देशमूख यांनी सांगातले. ते शिक्षक व शिक्षकेत्तर पतसंस्थेच्या २५ व्या सर्वसाधारण सभेत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. शिवाजीराव पिसाळ होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, पतसंस्थेला गेल्या आर्थिक वर्षात २० लाख ८८हजाराचा नफा झाला असून, ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे. संस्थेने नफ्याचे प्रमाण सातत्याने कायम ठेवले आहे.कर्ज वाटप करताना



**नातेपुते : नातेपुते एज्यूकेशन सोसायटी संचलित शिक्षक व शिक्षकेत्तर पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित मान्यवर**

काळजी घ्यावी, कोणाला जाणीवपूर्वक कर्ज अडवू नये, शिक्षक पतसंस्थेला १०० टक्के वसूल होत असतो, त्यामूळे संस्था प्रगतीपथावर आहे.

पतसंस्थेचे चेअरमन अनिल सावंत म्हणाले, या आर्थिक वर्षात ठेवी व कर्जामध्ये वाढ झाली आहे. ठेवी १ कोटी ५७ लाख तर कर्जे २ कोटी ३५ असून, २० लाखांचा नफा झाला आहे. असून संस्थेस ऑडिट 'अ' वर्ग मिळाला आहे. याप्रसंगी गूणवंत शिक्षक,विद्यार्थाचे सत्कार करण्यात आले.

या वार्षीक सर्वसाधारण सभेस नातेपुते एज्यूकेशन सोसायटीचे चेअरमन धैर्यशील देशमूख, सेक्रेटरी महेश शेटे, ॲड शिवाजीराव पिसाळ, पतसंस्थेचे चेअरमन अनिल सावंत, व्हा.चेअरमन निकम, सचिव पंढरीनाथ शिंदे, मूख्याध्यापक विठ्ठल पिसे, प्राथमिक विभाग मूख्याध्यापक कूंडलिक इंगळे, उपमूख्याध्यापक स्नेहल कूलकर्णी, उपप्राचार्य भारत पांढरे, पर्यवेक्षक दत्तात्रय यादव, विनायक देशपांडे आदि मान्यवर,संचालक, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रावणात एसटीचा 'एसटी संगे तीर्थाटन' उपक्रम

## मुख्यमंत्र्यांकडून कौतुक : प्रवाशांना अधिक दर्जेदार सुविधा देण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या विविध आगारांच्या माध्यमातून श्रावण महिन्यानिमित्त तीर्थक्षेत्री जाण्यासाठी 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

यामाध्यमातून ज्येष्ठ नागरिक, महिला यांना मोफत आणि माफक दरात तीर्थाटनाचा आनंद घेता येणार असून महामंडळाने प्रवाशांना अधिक दर्जेदार सुविधा देण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

श्रावण महिन्यामध्ये अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. त्या अनुषंगाने बहुतांश नागरिक कुटुंबासह तीर्थक्षेत्राला जाण्याचे नियोजन करतात. यासाठी एसटीने 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे.

एसटीच्या प्रत्येक आगारातून श्रावण महिन्यात एकदिवसीय अथवा एक मुक्कामी धार्मिक सहलीचे आयोजन करण्यात येत असून त्यामध्ये सर्व प्रकारच्या सवलती दिल्या जात आहेत. अमृतमहोत्सवी ज्येष्ठांना मोफत तर ज्येष्ठ



नागरिक व महिलांना तसेच १२ वर्षाच्या आतील मुलांना अर्धे तिकीट आकारण्यात येते. गावातील महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध सेवाभावी संस्था यांच्या पुढाकाराने अशाप्रकारे सांघिक सहलीचे आयोजन केले जाते. सवलतीमुळे माफक दरात तीर्थाटन करण्याचा आनंद सामान्यांना मिळतानाच एसटीच्या प्रवासी संख्येत वाढ होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, महिलांना प्रवासात पन्नास टक्के सवलत असे निर्णय राज्य शासनाने घेतले आहे. एसटीकडे प्रवाशांचा ओघ वाढतानाच चांगली सेवा आणि अभिनव उपक्रमांमुळे एसटीच्या उत्पन्नात भर पडेल अशी कामगिरी करण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

# महिला टोळीकडून सात चोऱ्याचा छडा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**इस्लामपूर :** वृद्धांचे पैसे, ऐवज लुटणाऱ्या परप्रांतीय महिलांच्या आंतरराज्य टोळीचे आणखी चोरीचे ७ गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी टोळीकडून २ लाख ३९ हजार रुपयांची रोकड, तीन मोबाईल असा २ लाख ६१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. इस्लामपूर पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रगटीकरणच्या पथकाने या टोळीला अटक केली. करिना जितेंद्र सिसोदिया (वय १९), राधिका प्रल्हादसिंह सिसोदिया (वय २४), वर्षा अजय सिसोदिया (वय ३२), अरविंदबाई सूरजसिंह सिसोदिया (वय ४३, सर्व रा. कडया, पोस्ट पिपलिया, ता. पचोर, जि. राजगड, मध्य प्रदेश) अशी टोळीतील महिलांची नावे आहेत. त्यांची रवानगी कारागृहात केली आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, ५ जुलै रोजी लाडेगाव येथील चंद्रभागा भीमराव बाबर (वय ६४) या पेन्शनचे पैसे काढण्यासाठी इस्लामपुरात गेल्या होत्या. बँकेतून पैसे घेऊन त्या बसस्थानाकडे निघाल्या होत्या. बसस्थानक परिसरात त्यांच्या समोरून व पाठीमागून महिला आल्या. त्यांनी चंद्रभागा यांच्या पिशवीतील १२ हजार रुपयांची रोकड, साहित्य लपास केले होते. गुन्हे प्रगटीकरणच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. पथकाने सापळा रचून महिलांच्या टोळीला ताब्यात घेतले.

टोळीतील महिलांनी बसस्थानक परिसरातील गुन्हाची कबुली दिली. या टोळीकडून इस्लामपूर पोलिस ठाणे हद्दीतील दोन, सांगली पोलिस ठाणे हद्दीतील दोन, तासगाव पोलिस ठाणे हद्दीतील एक, लातूर जिल्ह्यातील अहमदपूर पोलिस ठाणे हद्दीतील दोन गुन्हे असे एकूण सात गुन्हे उघडकीस आले आहेत.

# राखीव जागांवरील प्रवेशासाठी उद्या शेवटचा दिवस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत सध्या प्रतीक्षा यादीतील चौथ्या टप्प्यातील प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये प्रवेश घेण्यासाठी सोमवारी (दि.२१) शेवटचा दिवस आहे. प्रवेशासाठी अद्यापही १८ हजार ९६८ जागा रिक्त राहिल्या आहेत. प्रवेश प्रक्रियेद्वारे नियमित प्रवेश जाहीर झालेले विद्यार्थी आणि प्रतीक्षा यादीतील विद्यार्थी अशा एकूण ८२ हजार ८७९ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला.




प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. यंदा ८ हजार ८२३ शाळांतील १ लाख १ हजार ८४७ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी एकूण ३ लाख ६४ हजार ४१३ अर्ज दाखल झाले. प्रवेशासाठीच्या सोडतीतून ९४ हजार ७०० विद्यार्थ्यांना नियमित प्रवेश जाहीर करण्यात आले.

नियमित विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी चार फेर्या राबवण्यात आल्या.

त्यात पहिल्या फेरीत १३ हजार ६५५, दुसर्या फेरीत ३ हजार ५७९, तिसर्या फेरीत १ हजार २५९ आणि चौथ्या फेरीत ४७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. प्रवेशासाठी सोमवारी शेवटचा दिवस आहे. परंतु सध्या उपलब्ध जागांपैकी ८२ हजार ८७९ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. तर प्रवेशासाठी अद्यापही १८ हजार ९६८ जागा रिक्त राहिल्याचे संकेतस्थळावरील आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

# कांदा अनुदान रक्कम शेतकऱ्यांना वितरित होणार : अब्दुल सत्तार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** सन २०२३ या वर्षातील कांदा उत्पादन हंगामामध्ये कांद्याचे बाजारभाव घसरल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आले होते. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रती क्विंटल रू.३५० प्रमाणे २०० क्विंटलपर्यंत प्रति शेतकरी सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. याकरिता वित्त विभागाने पणन विभागास ४६५ कोटी ९९ लाख रुपये इतका निधी वितरीत केला आहे. लवकरच कांदा अनुदान रक्कम शेतकऱ्यांना वितरित करण्याची प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.

मंत्री श्री. सत्तार म्हणाले, कांद्याच्या दरात झालेल्या अभूतपूर्व घसरणीनंतर या शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी दिनांक २७ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पावसाळी अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्याकरिता ५५० कोटी रुपयांची पुरवणी मागणी मंजुर करण्यात आली आहे. यापैकी वित्त विभागाने पणन विभागास ४६५.९९ कोटी रुपये इतका निधी वितरीत केला आहे. या अनुदानासाठी लाल कांदा उत्पादक, लेट खरीप कांदा उत्पादक अशा सर्व पात्र कांदा उत्पादक लाभार्थी शेतकऱ्यांच्या मागण्या पणन विभागास प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये २३ जिल्ह्यांमधून कांदा अनुदान मागणी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापैकी १३


**अब्दुल सत्तार**

जिल्ह्यातील अनुदानाची मागणी अल्प स्वरुपाची आहे व उर्वरित १० जिल्ह्यांची मागणी जिल्हा निहाय रु.१० कोटीपेक्षा जास्त आहे. या १३ जिल्ह्यांची मागणी अल्प स्वरुपाची असल्यामुळे या यादीतील सर्व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना १०० टक्के देय अनुदानाची रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही तातडीने सुरु करण्याबाबतचे निर्देश मंत्री श्री. सत्तार यांनी विभागास दिले आहेत.

उर्वरित १० जिल्ह्यांची मागणी प्रति जिल्हा रु.१० कोटीपेक्षा जास्त असल्याने व वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेला निधी याचे प्रमाण एकूण निधी मागणीच्या सर्वसाधारणपणे ५३.९४ टक्के असल्याने या १० जिल्ह्यांच्या मागणीच्या ५३.९४ टक्के प्रमाणानुसार निधीचा पहिला हप्ता वितरीत करण्यात येणार आहे. देय निधीचा दुसरा हप्ता मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी अनुदानास मान्यता दिल्यानंतर प्रस्ताव तातडीने वित्त विभागाकडे सादर करून उर्वरित निधी प्राप्त होतास या १० जिल्ह्यांतील पात्र लाभार्थींना पुढचा हप्ता देण्यात येईल, असेही मंत्री श्री. सत्तार यांनी यावेळी सांगितले.

या अनुदानासाठी आतापर्यंत ३ लाख, ३६ हजार, ४७६ पात्र लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे. पात्र लाभार्थींची यादी ग्रामसभेत वाचन तसेच चावडी वाचन करून ग्रामपंचायत फलकावर लावण्यात येईल,असेही यावेळी मंत्री श्री. सत्तार यांनी यावेळी सांगितले.

# राज्यात प्रो–कबड्डीच्या धर्तीवर ३१ ऑगस्टला प्रो–गोविंदा स्पर्धेचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यात पहिल्यांदाच प्रो–कबड्डीच्या धर्तीवर वरळी येथील इन डोअर स्टेडियममध्ये ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत प्रो–गोविंदा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. मुक्तागिरी या शासकीय निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पत्रकार परिषदेला बंदरे, युवक व क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे सचिव नामदेव शिरगावकर, दहीहंडी समन्वय समितीचे पूर्वेश सरनाईक, गीता झगडे, श्रीकृष्ण पडळकर उपस्थित होते.

मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शन आणि सूचनेनुसार प्रो–गोविंदा स्पर्धा होणार असून गोविंदा पथकातील गोविंदांच्या सुरक्षेसाठी विमा कवच देण्यात आले आहे. यासाठी राज्यभरातील ५० हजार गोविंदांचा विमा उतरविण्यात आला असून मुंबईतील २० गोविंदा पथकांतील तीन हजार ५०० गोविंदांना विम्याचा लाभ होणार आहे.

अपघात होऊ नये यासाठी दहीहंडी समन्वय समितींना सूचना देण्यात आल्या असून त्यानुसार समिती नियमावली तयार करणार आहे. नियमावलीनुसार प्रत्येक स्पर्धकाची काळजी घेतली जाणार असून प्रत्येकाला हेल्मेट सक्तीचे करण्यात आले आहे. इनडोअर स्टेडियममध्ये ऑलिंपिकच्या धर्तीवर मॅटचा वापर करण्यात येणार असून गोविंदाचा मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास १० लाख रूपयांची मदत शासनातर्फे करण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

गोविंदा खेळाडूंचे कार्यक्रम, स्पर्धा वर्षभर घेण्यावर भर राहणार असून दहीहंडीला खेळाचा दर्जा देण्यात आला आहे. वरळी भागातील इनडोअर स्टेडियमध्ये ४० फूट उंची असल्याने तिथे स्पर्धा आयोजित केल्याची माहिती मंत्री श्री. सामंत यांनी दिली.

प्रो–गोविंदा स्पर्धेमध्ये एकूण १६ संघ सहभागी होणार असून पहिले बक्षिस ११ लाख रूपये, दुसरे बक्षिस ७ लाख रूपये, तिसरे बक्षिस ५ लाख रूपये आणि चौथे बक्षिस ३ लाख रूपये ठेवण्यात आले आहे. याचबरोबर महिला संघ आणि अंध गोविंदा पथकांनाही सहभागाबद्दल एक लाखांचे बक्षिस देण्यात येणार आहे.






# ई-बँकिंग भारतीय अर्थव्यवस्थेसाठी वरदान : ए.ए.बेडेकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** येथील पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय येथे वाणिज्य विभागाने ई-बँकिंग या विषयाच्या अभ्यागत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मार्गदर्शन करताना आयडीबीआय बँकेचे सह व्यवस्थापक ए.ए.बेडेकर यांनी प्रथम बँकांच्या उत्क्रांती चा आढावा घेतला.

बँकिंग क्षेत्र हे आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून या क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडून आलेले असल्याने या बदलामुळे भारतीय अर्थव्यवस्था अतिशय सक्षमपणे कार्य करीत असल्याचे म्हणाले. तसेच ई बँकिंग मुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मंदीची झळ पोचलेली नाही असे सांगत, ई बँकिंग प्रणालीमुळे बँकेकडून आपल्या ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सुरक्षितेच्या सोयीविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. आयडीबीआय शाखाअधिकारी अभिलेष कुमार यांनी ई-बँकिंग हे पूर्णपणे सुरक्षित आहे. त्याचबरोबर यावरती आरबीआयचे नियंत्रण आहे, तरीही ई-बँकिंग चा वापर करीत असताना घ्यावयाची काळजी याविषयी विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात ई-बँकिंग च्या कामकाजाची माहिती होण्यासाठी विद्यार्थी बँकेमध्ये आठ दिवसाचे ट्रेनिंग घेणार आहेत अशी माहिती या प्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.अमोल सोनवले यांनी दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.जे.ए.यादव अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एस.एस.परचुरे यांनी केले. तर आभार प्रा.नेहा मोरे यांनी मानले. सदर अभ्यागत व्याख्यानास प्रा.जी.आर.पाटील, प्रा.स्वप्नील पाटील व वाणिज्य विभागातील बी.कॉम. भाग ३ मधील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**तासगाव : येथे ई-बँकिंग या बाबत मार्गदर्शन करताना आयडीबीआय बँकेचे सह व्यवस्थापक ए.ए.बेडेकर व समोर उपस्थित विद्यार्थी**

# एमबीबीएसला प्रवेश मिळालेल्या साहिल झेंडे याचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** कोणताही कोचिंग क्लास न लावता लोणंद ता.माळशिरस येथील गरीब कुटुंबातील गवंडी काम करणाऱ्या विजय झेंडे यांचा मुलगा साहिल विजय झेंडे यांनी नेट परीक्षेमध्ये ५१३ मार्क मिळवून गव्हर्नमेंट कॉलेज लातूर या ठिकाणी एमबीबीएस साठी प्रवेश मिळविला. गरीब कुटुंबातील साहिलने आपल्या कौटुंबिक परिस्थितीची जाणीव ठेवून नियमित अभ्यास करून नेट परीक्षेमध्ये चांगल्या प्रकारे मार्क पाडून एमबीबीएस साठी प्रवेश मिळवल्याबद्दल माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी नातेपुते येथील शिवसेना भवन येथील कार्यालयात साहिल चे कौतुक करून सत्कार केला व पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले तसेच पुढील शैक्षणिक कामासाठी साहिलला कोणतीही अडचण आल्यास माझे सहकार्य राहील असे सांगितले. यावेळी नवनाथ झेंडे, भगत महाराज, विलास भोसले, विराज भोसले आधी उपस्थित होते.


**नातेपुते : साहिल झेंडे याचा सत्कार करताना शिवसेना तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर-पाटील व उपस्थित मान्यवर**

# लष्करी वाहन दरीत कोसळून लडाखमध्ये ९ जवान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**लडाख :** लडाखमध्ये चीन सीमेला लागून असलेल्या न्योमा परिसरात शनिवारी रात्री लष्कराचे एक वाहन दरीत कोसळून त्यातील ९ जवानांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एक अधिकारी असल्याचे सांगण्यात येते. एक जवान जखमी आहे.

ही दुर्घटना क्यारी शहरापासून ७ किलोमीटर अंतरावरील कारू गॅरीसनलगत झाली. ताफ्यात एकूण ५ वाहने होती. ताफ्यातील अन्य वाहने एकापाठोपाठ थांबली व त्यांतील जवानांनी बचावकार्य सुरू केले. जवानांनी आपल्या सहकार्यांना दुर्घटनाग्रस्त वाहनाबाहेर काढले. त्यातील दोघांचा श्वास सुरू होता. पैकी एकाचा पुढच्या काही सेकंदांतच मृत्यू झाला. जखमी जवानाला तातडीने रुग्णालयाच्या दिशेने नेण्यात आले. दरीत कोसळलेल्या वाहनात १० जवान होते. दरी अत्यंत खोल असल्याने दुर्घटनेचे गांभीर्य वाढले.

दुर्घटनेत मरण पावलेल्यांपैकी एक ज्युनिअर कमिशन्ड अधिकारी (जेसीओ) असल्याचे सांगितले जाते. जखमी जवानाला लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या दुर्घटनेवर दु:ख व्यक्त केले आहे. लडाखमधील दुर्घटनेतील भारतीय जवानांच्या मृत्यूने मी व्यथित आहे. त्यांच्या शोकसंतप्त कुटुंबीयांसोबत माझ्या सहवेदना आहेत, असे सिंह यांनी म्हटले आहे.

# स्पर्धा परीक्षा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शासन दक्ष

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ; गैरप्रकारास वाव नाही ; अफवा न पसरवण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**मुंबई :** राज्य शासन अतिशय नियोजनबद्धरित्या नामांकित संस्थांच्या माध्यमातून विविध पदभरतीच्या परीक्षा घेत आहे. कुठलाही गैरप्रकार करण्यास वाव नसून परीक्षा केंद्रांवरील कर्मचाऱ्यांना सुद्धा दक्ष राहण्याचे निर्देश आहेत, त्यामुळेच नाशिक येथे परीक्षा केंद्रावर तलाठी पदाच्या ऑनलाईन परीक्षेच्यावेळी तीन संशयितांना पकडण्यात यश आले. या परीक्षा व्यवस्थित पार पाडण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, याविषयी कुणीही संभ्रम निर्माण करू नये व अफवाही पसरवू नये असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

नाशिक शहरातील म्हसरूळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत काल परीक्षा केंद्रावरून पोलिसांनी तीन संशयितांना पकडले आणि त्यांच्याकडून टॅब, वॉकी टॉकी, मोबाईल फोन, हेडफोन असे साहित्य जप्त केले आहे. त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडीही देण्यात आली असून कोणत्याही परिस्थितीत पारदर्शी आणि शिस्तबद्धरित्या पदभरतीच्या परीक्षा घेण्यात येत आहेत असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पूर्वीच्या काळात अशा स्पर्धा परीक्षांत काही गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले होते. सदोष भरती प्रक्रियेमुळं विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला होता. आणि म्हणूनच राज्य शासनाने टीसीएस आणिआयबीपीएस या कंपन्यांकडून या परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे आणि या संस्था काटेकोरपणे या परीक्षा घेतील. राज्य शासनाचे सर्व प्रक्रियेकडे बारकाईने लक्ष आहे, असेही मुख्यमंत्री म्हणतात.






# तीन तिगाडा काम बिगाडा सरकार : सचिन सावंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


सचिन सावंत

**मुंबई :** महाराष्ट्रात आत्ताचं जे सरकार आहे त्याला महायुतीचं सरकार असंच म्हटलं जातं आहे. कारण अजित पवार हे राष्ट्रवादीच्या आमदारांसह सत्तेत सहभागी झाले आहेत. अजित पवार राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. तसंच त्यांच्याकडे अर्थ खात्याची जबाबदारीही देण्यात आली आहे. त्याआधी एकनाथ शिंदेंसह शिवसेनेतले ४० आमदार पक्षातून बंड करुन बाहेर पडले. भाजपा, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांची सत्ता सध्या आहे. याच महायुतीच्या सरकारची काँग्रेसने खिल्ली उडवली आहे. सचिन सावंत यांनी अंदाज अपना अपना या सिनेमातला एक प्रसंग ट्वीट करण्यात आला आहे. यात आमिर खान, सलमान खान आणि परेश रावल हे एकाच लुनावरुन जाण्याचा प्रयत्न करत आहेत. आमिर खान आणि सलमान खान म्हणजे शिंदे गट आणि अजित पवार गट असं दाखवण्यात आलं आहे. तर परेश रावल म्हणजे भाजपा असं दाखवलं गेलं आहे. आमिर खान आणि सलमान खान लुनावर बसलेले असतात पण परेश रावलला जागाच नसते. मागे बसा, पुढे बसा असं दोघे सांगतात. शेवटी परेश रावल चिडतो आणि दोघांना खाली उतरवतो. मग स्वतः लुनावर बसतो आणि लुना सुरु करतो. त्यावेळी सलमान आणि आमिर हे मागच्या सीटवर कसेबसे बसतात. मात्र परेश रावल लुना घेऊन निघून जातो आणि हे दोघे मागेच राहतात. आत्ताच्या भाजपा-शिंदे गट आणि अजित पवार गट या सरकारची अवस्था अशीच आहे असं सचिन सावंत यांनी म्हटलं आहे.







स्वच्छ भारत, सुंदर भारत
स्वच्छ घर, सुंदर घर

खुषखबर! खुषखबर!! खुषखबर!!!

आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत...........

माणगंगा
सेफ्टीटँक ड्रेनेज क्लीनिंग सर्व्हिस

आपली संडास टाकी, शोषखड्डा, गोबर गॅस टाकी भरलेली आहे का ......... ?

चिंता करू नका......

फक्त खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन लावा.

आपली संडास टाकी, आधुनिक मशिनच्या सह्याने एकदम वाजवी दरात स्वच्छ करून दिली जाईल.

किरण रणदिवे
7028723789/ 9921030708

टिप :- कृपया फोन करा व जहिरात जपून ठेवा, शेजाऱ्याना उपयोगात येईल.


# टाटा म्हणजेच विश्वास : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## महाराष्ट्राचा पहिला उद्योगरत्न पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांना प्रदान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पहिला 'उद्योगरत्न' पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक, पद्मविभूषण रतन टाटा यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला. 'टाटा म्हणजे ट्रस्ट. टाटा म्हणजे विश्वास अशी जगभर ख्याती असलेल्या उद्योग समूहाचे रतन टाटा यांना हा पुरस्कार देण्याने पुरस्काराचा सन्मान वाढला आहे,'असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पुरस्कार प्रदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.

श्री. टाटा यांना त्यांच्या कुलाबा येथील निवासस्थानी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासह मान्यवरांनी २५ लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरुपात पुरस्कार प्रदान केला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, टाटा सन्सचे चेअरमन तथा महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी उपस्थित होते.

पुरस्कार प्रदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मीठापासून ते वाहने, विमानांपर्यंत टाटा समूहाच्या उद्योगातून निर्मिती होते. टाटा समुहाने देशासह, जगभरात उद्योग क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. टाटा म्हणजेच विश्वास हे नाते आहे. राज्य शासनातर्फे उद्योग क्षेत्रातील योग्य व्यक्तीला पहिला पुरस्कार देण्यात येत असल्याचा आनंद आहे. या पुरस्काराने पुरस्काराचा मानसन्मान वाढला, उंची वाढल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तत्पूर्वी श्री. टाटा यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी श्री. टाटा यांच्यासमवेत श्री. चंद्रशेखरन आदींशी उद्योग आणि राज्यातील विकास प्रकल्पांविषयी चर्चा केली.

महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या नामवंत उद्योजकांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराच्या धर्तीवर या वर्षीपासून राज्य शासनाने 'महाराष्ट्र उद्योग पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. यात उद्योगरत्न पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक पद्मविभूषण रतन टाटा, उद्योगमित्र पुरस्कार सिरम इन्स्टिट्यूटचे अदर पुनावाला यांना तर उद्योगिनी पुरस्कार किर्लोस्कर समूहाच्या गौरी किर्लोस्कर, उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार विलास शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे. हे पुरस्कार उद्या रविवारी (दि.२० ) समारंभपूर्वक राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. हा समारंभ वांद्रे-कुर्ला संकुलमधील जीओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमधील जास्मिन हॉलमध्ये दुपारी दोन वाजता होणार आहे.


**मुंबई : रतन टाटा यांना महाराष्ट्राचा पहिला उद्योगरत्न पुरस्कार प्रदान करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार व उपस्थित मान्यवर**